Paper : **II**

Subject : **MARATHI**

Subject Code : **35**

Roll No. | | | | | | | |

(Figures as per admission card)

OMR Sheet No. : ________________

**BOOKLET SERIAL NO.**

## Name & Signature of Invigilator/s

Signature : ______________________

Name : ______________________

Time : 2 Hours — Maximum Marks : 200

Number of Pages in this Booklet : **16** — Number of Questions in this Booklet : **100**

### ಅಭ್ಯರ್ಥಿಗಳಿಗೆ ಸೂಚನೆಗಳು

1. ಈ ಪುಟದ ಮೇಲ್ತುದಿಯಲ್ಲಿ ಒದಗಿಸಿದ ಸ್ಥಳದಲ್ಲಿ ನಿಮ್ಮ ರೋಲ್ ನಂಬರನ್ನು ಬರೆಯಿರಿ.
2. ಈ ಪತ್ರಿಕೆಯು ಬಹು ಆಯ್ಕೆ ವಿಧದ ನೂರು (100) ಪ್ರಶ್ನೆಗಳನ್ನು ಒಳಗೊಂಡಿದೆ.
3. ಪರೀಕ್ಷೆಯ ಪ್ರಾರಂಭದಲ್ಲಿ, ಪ್ರಶ್ನೆ ಪುಸ್ತಿಕೆಯನ್ನು ನಿಮಗೆ ನೀಡಲಾಗುವುದು. ಮೊದಲ 5 ನಿಮಿಷಗಳಲ್ಲಿ ನೀವು ಪುಸ್ತಿಕೆಯನ್ನು ತೆರೆಯಲು ಮತ್ತು ಕೆಳಗಿನಂತೆ ಕಡ್ಡಾಯವಾಗಿ ಪರೀಕ್ಷಿಸಲು ಕೋರಲಾಗಿದೆ.
   (i) ಪ್ರಶ್ನೆಪುಸ್ತಿಕೆಗೆ ಪ್ರವೇಶಾವಕಾಶ ಪಡೆಯಲು, ಈ ಹೊದಿಕೆ ಪುಟದ ಅಂಚಿನ ಮೇಲಿರುವ ಪೇಪರ್ ಸೀಲನ್ನು ಹರಿಯಿರಿ. ಸ್ಟಿಕ್ಕರ್ ಸೀಲ್ ಇಲ್ಲದ ಅಥವಾ ತೆರೆದ ಪುಸ್ತಿಕೆಯನ್ನು ಸ್ವೀಕರಿಸಬೇಡಿ.
   (ii) **ಪುಸ್ತಿಕೆಯಲ್ಲಿನ ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ ಮತ್ತು ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆಯನ್ನು ಮುಖಪುಟದ ಮೇಲೆ ಮುದ್ರಿಸಿದ ಮಾಹಿತಿಯೊಂದಿಗೆ ತಾಳೆ ನೋಡಿರಿ. ಪುಟಗಳು/ಪ್ರಶ್ನೆಗಳು ಕಾಣೆಯಾದ ಅಥವಾ ದ್ವಿಪ್ರತಿ ಅಥವಾ ಅನುಕ್ರಮವಾಗಿಲ್ಲದ ಅಥವಾ ಇತರ ಯಾವುದೇ ವ್ಯತ್ಯಾಸದ ದೋಷಪೂರಿತ ಪುಸ್ತಿಕೆಯನ್ನು ಕೂಡಲೆ 5 ನಿಮಿಷದ ಅವಧಿ ಒಳಗೆ, ಸಂವೀಕ್ಷಕರಿಂದ ಸರಿ ಇರುವ ಪುಸ್ತಿಕೆಗೆ ಬದಲಾಯಿಸಿಕೊಳ್ಳಬೇಕು. ಆ ಬಳಿಕ ಪ್ರಶ್ನೆಪತ್ರಿಕೆಯನ್ನು ಬದಲಾಯಿಸಲಾಗುವುದಿಲ್ಲ, ಯಾವುದೇ ಹೆಚ್ಚು ಸಮಯವನ್ನೂ ಕೊಡಲಾಗುವುದಿಲ್ಲ.**
4. ಪ್ರತಿಯೊಂದು ಪ್ರಶ್ನೆಗೂ (A), (B), (C) ಮತ್ತು (D) ಎಂದು ಗುರುತಿಸಿದ ನಾಲ್ಕು ಪರ್ಯಾಯ ಉತ್ತರಗಳಿವೆ. ನೀವು ಪ್ರಶ್ನೆಯ ಎದುರು ಸರಿಯಾದ ಉತ್ತರದ ಮೇಲೆ, ಕೆಳಗೆ ಕಾಣಿಸಿದಂತೆ ಅಂಡಾಕೃತಿಯನ್ನು ಕಪ್ಪಾಗಿಸಬೇಕು.

   **ಉದಾಹರಣೆ :** (A) (B) ● (D)

   (C) ಸರಿಯಾದ ಉತ್ತರವಾಗಿದ್ದಾಗ.
5. ಈ ಪ್ರಶ್ನೆ ಪತ್ರಿಕೆಯ ಜೊತೆಯಲ್ಲಿ **ಕೊಟ್ಟಿರುವ OMR ಉತ್ತರ ಹಾಳೆಯಲ್ಲಿ ನಿಮ್ಮ ಉತ್ತರಗಳನ್ನು ಸೂಚಿಸತಕ್ಕದ್ದು**. OMR ಹಾಳೆಯಲ್ಲಿ ಅಂಡಾಕೃತಿಯಲ್ಲದೆ ಬೇರೆ ಯಾವುದೇ ಸ್ಥಳದಲ್ಲಿ ಉತ್ತರವನ್ನು ಗುರುತಿಸಿದರೆ, ಅದರ ಮೌಲ್ಯಮಾಪನ ಮಾಡಲಾಗುವುದಿಲ್ಲ.
6. OMR ಉತ್ತರ ಹಾಳೆಯಲ್ಲಿ ಕೊಟ್ಟ ಸೂಚನೆಗಳನ್ನು ಜಾಗರೂಕತೆಯಿಂದ ಓದಿರಿ.
7. ಎಲ್ಲಾ ಕರಡು ಕೆಲಸವನ್ನು ಪುಸ್ತಿಕೆಯ ಕೊನೆಯಲ್ಲಿ ಮಾಡತಕ್ಕದ್ದು.
8. ನಿಮ್ಮ ಗುರುತನ್ನು ಬಹಿರಂಗಪಡಿಸಬಹುದಾದ ನಿಮ್ಮ ಹೆಸರು ಅಥವಾ ಯಾವುದೇ ಚಿಹ್ನೆಯನ್ನು, ಸಂಗತವಾದ ಸ್ಥಳ ಹೊರತು ಪಡಿಸಿ, OMR ಉತ್ತರ ಹಾಳೆಯ ಯಾವುದೇ ಭಾಗದಲ್ಲಿ ಬರೆದರೆ, ನೀವು ಅನರ್ಹತೆಗೆ ಬಾಧ್ಯರಾಗುತ್ತೀರಿ.
9. ಪರೀಕ್ಷೆಯು ಮುಗಿದನಂತರ, ಕಡ್ಡಾಯವಾಗಿ OMR ಉತ್ತರ ಹಾಳೆಯನ್ನು ಸಂವೀಕ್ಷಕರಿಗೆ ನೀವು ಹಿಂತಿರುಗಿಸಬೇಕು ಮತ್ತು ಪರೀಕ್ಷಾ ಕೊಠಡಿಯ ಹೊರಗೆ OMRನ್ನು ನಿಮ್ಮೊಂದಿಗೆ ಕೊಂಡೊಯ್ಯಕೂಡದು.
10. ಪರೀಕ್ಷೆಯ ನಂತರ, ಪರೀಕ್ಷಾ ಪ್ರಶ್ನೆಪತ್ರಿಕೆಯನ್ನು ಮತ್ತು ನಕಲು OMR ಉತ್ತರ ಹಾಳೆಯನ್ನು ನಿಮ್ಮೊಂದಿಗೆ ತೆಗೆದುಕೊಂಡು ಹೋಗಬಹುದು.
11. **ನೀಲಿ/ಕಪ್ಪು ಬಾಲ್‌ಪಾಯಿಂಟ್ ಪೆನ್ ಮಾತ್ರವೇ ಉಪಯೋಗಿಸಿರಿ.**
12. **ಕ್ಯಾಲ್ಕುಲೇಟರ್, ವಿದ್ಯುನ್ಮಾನ ಉಪಕರಣ ಅಥವಾ ಲಾಗ್ ಟೇಬಲ್ ಇತ್ಯಾದಿಯ ಉಪಯೋಗವನ್ನು ನಿಷೇಧಿಸಲಾಗಿದೆ.**
13. **ಸರಿ ಅಲ್ಲದ ಉತ್ತರಗಳಿಗೆ ಋಣ ಅಂಕ ಇರುವುದಿಲ್ಲ.**
14. **ಕನ್ನಡ ಮತ್ತು ಇಂಗ್ಲೀಷ್ ಆವೃತ್ತಿಗಳ ಪ್ರಶ್ನೆಪತ್ರಿಕೆಗಳಲ್ಲಿ ಯಾವುದೇ ರೀತಿಯ ವ್ಯತ್ಯಾಸಗಳು ಕಂಡುಬಂದಲ್ಲಿ, ಇಂಗ್ಲೀಷ್ ಆವೃತ್ತಿಗಳಲ್ಲಿರುವುದೇ ಅಂತಿಮವೆಂದು ಪರಿಗಣಿಸಬೇಕು.**

### Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of Hundred multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of the cover page. Do not accept a booklet without sticker seal or open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.

   **Example :** (A) (B) ● (D)

   where (C) is the correct response.
5. Your responses to the questions are to be indicated in the **OMR Sheet kept inside this Booklet.** If you mark at any place other than in the circles in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read the instructions given in OMR carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your name or put any mark on any part of the OMR Answer Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the OMR Answer Sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must NOT carry it with you outside the Examination Hall.
10. You can take away question booklet and carbon copy of OMR Answer Sheet after the examination.
11. **Use only Blue/Black Ball point pen.**
12. **Use of any calculator, electronic gadgets or log table etc., is prohibited.**
13. **There is no negative marks for incorrect answers.**
14. **In case of any discrepancy found in the Kannada translation of a question booklet the question in English version shall be taken as final.**

# MARATHI
## Paper – II

**निर्देश :** या प्रश्नपत्रिकेत **शंभर (100)** बहुविकल्पीय प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न अनिवार्य आहेत.

**1.** नवीन भाषा शिकताना पुढीलपैकी कोणता अनुक्रम योग्य ठरतो ?

(A) वाचणे, लिहिणे, बोलणे, ऐकणे

(B) बोलणे, वाचणे, ऐकणे, लिहिणे

(C) ऐकणे, बोलणे, वाचणे, लिहिणे

(D) लिहिणे, वाचणे, ऐकणे, बोलणे

**2.** शुभरजनी, शुभप्रभात, धन्यवाद, आभार यात कोणत्या भाषेच्या चालीरीतीचा, शिष्टाचाराचा प्रभाव आहे ?

(A) हिंदी (B) इंग्रजी

(C) तेलुगु (D) कन्नड

**3.** 'त्रिनेत्र' हा कोणता समास आहे ?

(A) कर्मधारय (B) अव्ययीभाव

(C) द्वंद्व (D) द्विगु

**4.** भाषोत्पत्तिविषयक सिद्धान्त आणि त्यांचे प्रणेते यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| (a) इंगित सिद्धान्त | (i) जी. रेवेझ |
| (b) संपर्क सिद्धान्त | (ii) स्वीट |
| (c) समन्वय सिद्धान्त | (iii) लुडविग न्वार |
| (d) श्रमपरिहार सिद्धान्त | (iv) डॉ. राये |

(A) (a)-(iv), (b)-(i), (c)-(ii), (d)-(iii)

(B) (a)-(ii), (b)-(iv), (c)-(iii), (d)-(i)

(C) (a)-(i), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(iv)

(D) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)

**5.** 'डिंग-डाँग' सिद्धान्ताचा निर्देश आणि विचाराचे श्रेय पुढीलपैकी कोणत्या दोन अभ्यासकांस जाते ?

(a) डॉ. राये

(b) प्लेटो

(c) जी. रेवेझ

(d) मॅक्समुल्लर

(A) (a) आणि (b) (B) (b) आणि (c)

(C) (c) आणि (d) (D) (b) आणि (d)

**6.** मराठीत 'कवी' या रूपाची किती रूपिकान्तरे संभवतात ?

(A) एक (B) दोन

(C) तीन (D) चार

**7.** पुढे दोन वाक्ये दिलेली आहेत. (A) वाक्याचे स्पष्टीकरण (R) वाक्यात दिलेले आहे. या दोन वाक्यांच्या आधारे योग्य पर्याय निवडा.

(A) रूढ भाषा हेच संप्रेषण माध्यमांचेही अधिष्ठान आहे.

(R) आंतरजाला सारख्या (इंटरनेट) इलेक्ट्रॉनिक संप्रेषण माध्यमांनी स्वीकारलेल्या चिन्हांकन पद्धतीमुळे रूढ भाषेची गरज संपली.

(A) (A) आणि (R) बरोबर, आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) बरोबर, आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आहे, परंतु (R) चूक आहे

(D) (A) चूक आहे, परंतु (R) बरोबर आहे

**8.** बोलींचे परस्पर संबंध दर्शविणारी दोन लक्षणे कोणती ?

(a) अलंकारिकता

(b) पारस्परिक बोधगम्यता

(c) ग्रंथसंपदा

(d) ऐतिहासिक समानता

(A) (a) आणि (b) (B) (b) आणि (c)

(C) (b) आणि (d) (D) (d) आणि (c)

**9.** पुढीलपैकी कोणता शब्द लेखनविषयक नियमानुसार योग्य आहे ?

(A) सांवीधानिक (B) सांवीधानीक

(C) सांविधानिक (D) सांविधानीक

**10.** भाषिक सापेक्षतावादाचा सिद्धांत कोणी मांडला ?

(A) बर्नस्टीन

(B) बेंजामिन ली वोर्फ

(C) गम्पर्झ

(D) मॅलिनोवस्की

**11.** पुढे दोन वाक्ये दिलेली आहेत. (A) वाक्याचे स्पष्टीकरण (R) वाक्यात दिलेले आहे. या दोन वाक्यांच्या आधारे योग्य पर्याय निवडा.

(A) जीवनाच्या सर्वांगीण बदलाचे एक अपरिहार्य अंग म्हणूनच अभिरुचीतील बदलांकडे पहावे लागते.

(R) सामाजिक स्थित्यंतर, राजकीय क्रांती, आर्थिक बदल, विज्ञानक्षेत्रातील नवशोध अशा गोष्टींमुळे व्यक्तिगत जाणिवांत बदल घडून येत असतात.

(A) (A) आणि (R) बरोबर आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) बरोबर आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आहे, परंतु (R) चूक आहे

(D) (A) चूक आहे, परंतु (R) बरोबर आहे

**12.** गणपत कृष्णाजी भंडारीयांच्या छापखान्यातून प्रकाशित झालेली दोन पुस्तके कोणती ?

(a) पांडुरंग स्तोत्र

(b) वेदोक्तधर्मप्रकाश

(c) एकनाथकृत रुक्मिणीसैंवर

(d) सुखदायक राज्यप्रकरणी निबंध

(A) (a) आणि (c)

(B) (b) आणि (d)

(C) (c) आणि (d)

(D) (c) आणि (b)

**13.** भारूडातील अनेक सोंगे काढण्याच्या प्रथेतून पुढे ललिताचा जन्म झाला असावा, असे कोणी म्हटले आहे ?

(A) लक्ष्मणशास्त्री जोशी

(B) वि. कृ. जोशी

(C) महादेवशास्त्री जोशी

(D) प्र.न. जोशी

**14.** सामान्य वाचकांपेक्षाज्या वाचकांची अभिरुची विकसित झालेली आहे, अशाच वाचकांची अभिरुची, ग्रंथाची योग्यता ठरविताना ध्यानी घ्यावी असे कोणी म्हटले आहे ?

(A) बेनजॉन्सन

(B) ॲन्ड्रयूमॉरस

(C) आर्थर क्विलर काऊच

(D) ए. जी. गार्डिनर

**15.** महाराष्ट्रात गणपत कृष्णाजीचा छापखाना कोणत्या वर्षी सुरू झाला ?

(A) 1824 (B) 1835

(C) 1831 (D) 1836

**16.** 'मराठी नकाशाचे पुस्तक' हे कोणत्या दोन लेखकांनी लिहिलेले आहे ?

(a) गंगाधरशास्त्री फडके

(b) दादोबा पांडुरंग

(c) विष्णुबुवा ब्रह्मचारी

(d) नाना नारायण

(A) (a) आणि (b) (B) (b) आणि (c)

(C) (c) आणि (d) (D) (b) आणि (d)

**17.** लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' ला कोणत्या वर्षीचा साहित्य ॲकादेमी पुरस्कार प्राप्त झाला ?

(A) 1981 (B) 1985

(C) 1980 (D) 1188

**18.** भारतीय ज्ञानपीठ पुरस्काराचा प्रारंभ कोणत्या वर्षी झाला ?

(A) 1966 (B) 1965

(C) 1962 (D) 1969

**19.** 1975 साली कराड येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कोण होते ?

(A) दुर्गा भागवत (B) कुसुमावती देशपांडे

(C) शांता शेळके (D) विजया राजाध्यक्ष

**20.** 'नव्या गुजगोष्टी' हा लघु निबंध संग्रह कोणाचा ?

(A) वा. म. जोशी (B) ना. गो. चापेकर

(C) वि.स. खांडेकर (D) ना.सी. फडके

**21.** 'राष्ट्र म्हणजे एकमय लोक' – ही 'राष्ट्र' या संकल्पनेशी निगडीत व्याख्या कोणी केली ?

(A) राजर्षी शाहू महाराज

(B) कर्मवीर भाऊराव पाटील

(C) सयाजीराव गायकवाड

(D) महात्मा जोतिराव फुले

**22.** ''भारतीय साहित्य एकच आहे; पण ते अनेक भाषांतून लिहिले जाते'' हे विधान कोणाचे ?

(A) सरोजिनी नायडू

(B) डॉ. मिनाक्षी मुखर्जी

(C) डॉ. सिसिरकुमार दास

(D) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

**23.** ''भारतातील अनेक भाषात आख्यानपर व गेय पदवाङ्मयाच्या स्वरूपात कीर्तनोपयोगी काव्यनिर्मिती झालेली आहे'' असे कोणी म्हटले आहे ?

(A) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

(B) डॉ. विलास खोले

(C) डॉ. र. रा. गोसावी

(D) डॉ. निशिकांत मिरजकर

**24.** 'आंतरभारती' चा निर्माता कोण ?

(A) रवींद्रनाथ टागोर (B) श्री अरविंद घोष

(C) विनोबा भावे (D) साने गुरूजी

**25.** मास्ति वेंकटेश अय्यंगार यांच्या 'चिक्कवीर राजेंद्र' या कादंबरीचा मराठी अनुवादक कोण ?

(A) रं. शा. लोकापूर

(B) उमाकांत ठोमरे

(C) उमा कुलकर्णी

(D) शकुंतला बोरगावकर

**26.** भारतामध्ये आधुनिक भारतीय भाषाविभाग कोठे सुरू झाला ?

(A) मुंबई (B) शांतिनिकेतन

(C) कोलकत्ता (D) मद्रास

**27.** पुढीलपैकी कोणते नाटक लोक–कलेवर आधारित आहे ?

(A) आकाशभासे निळे

(B) नटसम्राट

(C) खंडोबाचे लगीन

(D) हिमालयाची सावली

**28.** भारतात आधुनिक भारतीय भाषांचा विभाग केव्हा सुरू झाला ?

(A) 1919

(B) 1921

(C) 1924

(D) 1925

**29.** 'राजाजींच्या गोष्टी' या मूळ तमिळ कथांचा मराठी अनुवाद कोणी केला ?

(A) पु. वि. बोबडे

(B) मनोरमा आठवले

(C) श्रीकांत रानडे

(D) माधव कानिटकर

**30.** 'अनुकृती' हा कोणत्या अनुवादाचा उपप्रकार आहे ?

(A) भावानुवाद

(B) मुक्तानुवाद

(C) शब्दश: अनुवाद

(D) लिप्यंतर

**31.** लोकसाहित्यविषयक ग्रंथ आणि त्याचे ग्रंथकार यांच्या जोड्या लावा.

| | |
|---|---|
| (a) लोकनागर रंगभूमी | (i) दुर्गा भागवत |
| (b) लोकसाहित्य : आकलन आणि आस्वाद | (ii) मधुकर वाकोडे |
| (c) लोकप्रतिभा आणि लोकतत्त्व | (iii) तारा भवाळकर |
| (d) धर्म आणि लोकसाहित्य | (iv) गंगाधर मोरजे |

योग्य पर्याय निवडा :

(A) (a)-(i), (b)-(iii), (c)-(iv), (d)-(ii)

(B) (a)-(ii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(iii)

(C) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(ii), (d)-(i)

(D) (a)-(iv), (b)-(ii), (c)-(i), (d)-(iii)

**32.** 'मौखिकता आणि लोकसाहित्य' या ग्रंथाचे संपादन पुढीलपैकी कोणत्या दोघांनी केले आहे ?

(a) सरोजिनी बाबर

(b) गंगाधर मोरजे

(c) मधुकर वाकोडे

(d) सुषमा करोगल

योग्य पर्याय निवडा :

(A) (a) आणि (b)

(B) (b) आणि (c)

(C) (c) आणि (d)

(D) (b) आणि (d)

**33.** सोंगाड्या कोणत्या लोकप्रयोज्य कलेत असतो ?

(A) कीर्तन

(B) चित्रकथी

(C) तमाशा

(D) वासुदेव

**34.** मराठीमध्ये लोकसाहित्याच्या अभ्यासाचा पाया कोणी घातला असे मानले जाते ?

(A) दुर्गा भागवत

(B) वि. का. राजवाडे

(C) दत्तो वामन पोतदार

(D) रा. चिं. ढेरे

**35.** ''जातिव्यवस्था नामशेष होईपर्यंत हा संघर्ष अबाधित राहील, म्हणून दलित साहित्याने अब्राह्मणी सौंदर्यशास्त्राचा पर्याय उभा करण्यातच पुढाकार घेतला पाहिजे,'' असे मत कोणी मांडले आहे ?

(A) जनार्दन वाघमारे (B) भालचंद्र फडके

(C) यशवंत मनोहर (D) शरद पाटील

**36.** पुढे दोन वाक्ये दिलेली आहेत. (A) वाक्याचे स्पष्टीकरण (R) वाक्यात दिलेले आहे. या दोन वाक्यांच्या आधारे योग्य पर्याय निवडा.

(A) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'काळ' या नियतकालिकातून अनेक महत्वाचे शोधनिबंध लिहिले आहेत.

(R) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक शोधनिबंध लेखनामुळे दलित समाजात परिवर्तन घडून आले.

(A) (A) आणि (R) बरोबर, आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) बरोबर, आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आहे, परंतु (R) चूक आहे

(D) (A) चूक आहे, परंतु (R) बरोबर आहे

**37.** पुढील जलसाकारापैकी कोणास आंबेडकरी जलसाकर म्हणत नाहीत ?

(A) भीमराव कर्डक

(B) बापू संभू शिंदे

(C) केरूबुवा गायकवाड

(D) पट्टे बाबुराव

**38.** 'रामप्रहर' हे आत्मचरित्र कोणत्या ग्रामीण लेखकाचे आहे ?

(A) रा. ना. झोळ

(B) आनंद यादव

(C) रा. रं. बोराडे

(D) शंकर पाटील

**39.** पुढीलपैकी जगदीश कदम यांचे दोन ग्रामीण काव्यसंग्रह कोणते ?

(a) रास आणि गोंदर

(b) हिरवे जग

(c) नामदेव शेतकरी

(d) जंगलझडी

योग्य पर्याय निवडा :

(A) (a) आणि (c)

(B) (a) आणि (b)

(C) (c) आणि (d)

(D) (b) आणि (d)

**40.** महादेव मोरे यांच्या कादंबऱ्यांच्या प्रकाशन वर्षानुसार पुढीलपैकी योग्य अनुक्रम कोणता ?

(A) प्रवाह, झंगाट, पाव्हणा, रैत

(B) रैत, प्रवाह, झंगाट, पाव्हणा

(C) पाव्हणा, रैत, प्रवाह, झंगाट

(D) झंगाट, पाव्हणा, रैत, प्रवाह

**41.** पुढे दोन वाक्ये दिली आहेत. (A) वाक्याचे स्पष्टीकरण (R) वाक्यात दिलेले आहे. या दोन वाक्यांच्या आधारे योग्य पर्याय निवडा.

(A) वाङ्.मयाचा इतिहास लिहिताना मुद्रित ग्रंथासोबत हस्तलिखितांचाही उपयोग करायचा असतो.

(R) पुस्तक छापले गेले नाही याचा अर्थ ते अस्तंगत राहिले; म्हणून त्याचा उपयोग वाङ्मयेतिहासात करता येत नाही, हे म्हणणे चुकीचे ठरेल.

(A) (A) आणि (R) बरोबर आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) बरोबर पण, (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आणि (R) चूक

(D) (A) चूक आणि (R) बरोबर

**42.** ओवीबद्ध 'महाभारता'ची रचना कोणी केली ?

(A) ज्ञानेश्वर (B) मोरोपंत

(C) मुक्तेश्वर (D) ना.गो. नांदापूरकर

**43.** 'भक्तविजय' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) महीपती (B) उद्धव चिद्धन

(C) दासो दिगंबर (D) दासगणू

**44.** 'वच्छाहरण' हे काव्य कोणी रचले ?

(A) रवळो व्यास

(B) नरींद्र

(C) दामोदर पंडित

(D) भास्करभट्ट बोरीकर

**45.** पुढीलपैकी केशवसुतांच्या दोन कविता कोणत्या ?

(a) तुतारी

(b) दसरा

(c) रांगोळी घालताना पाहून

(d) शीळ

(A) (a) आणि (b)

(B) (a) आणि (c)

(C) (a) आणि (d)

(D) (b) आणि (c)

**46.** कृष्णाजी प्रभाकर धाडीलकर यांची पुढीलपैकी दोन नाटके कोणती ?

(a) मतिविकार

(b) विद्याहरण

(c) पुण्यप्रभाव

(d) भाऊबंदकी

(A) (a) आणि (b)

(B) (a) आणि (c)

(C) (a) आणि (d)

(D) (b) आणि (d)

**47.** ‘डॉ. आंबेडकरांचे अंतरंग’ पुस्तकाचे लेखक कोण ?

(A) यशवंत मनोहर

(B) भालचंद्र फडके

(C) केशव मेश्राम

(D) द.न. गोखले

**48.** पुढीलपैकी कोणती कादंबरी उद्‌धव शेळके यांची आहे ?

(A) रणांगण (B) धग

(C) माणूस (D) बळी

**49.** पुढीलपैकी कोणती दोन पुस्तके साने गुरूजी यांनी लिहिली ?

(a) भारतीय संस्कृती

(b) मिरी

(c) गोट्या

(d) फुलांची ओंजळ

(A) (a) आणि (d)

(B) (b) आणि (c)

(C) (c) आणि (d)

(D) (a) आणि (b)

**50.** ग्रंथ व ग्रंथकार यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| (a) राजा शिवाजी | (i) ना. सी. फडके |
| (b) आग्याहून सुटका | (ii) मामा वरेरकर |
| (c) जानकी | (iii) विष्णू हरी औंधकर |
| (d) अपूर्व बंगाल | (iv) यशवंत नारायण टिप्पणीस |

(A) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)

(B) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(i), (d)-(ii)

(C) (a)-(ii), (b)-(iii), (c)-(i), (d)-(iv)

(D) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(ii), (d)-(i)

पुढील उताऱ्यावर **चार** प्रश्न दिलेले आहेत. उतारा वाचून त्यावरील प्रश्नांच्या उत्तरांचे योग्य पर्याय निवडा.

सामाजिक चळवळींची ही विविध रूपे ध्यानात घेता आज ज्या अर्थाने सामाजिक चळवळी ही संकल्पना वापरली जाते तिची चार ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील. एक, सामाजिक चळवळी या नित्य, स्थिर समाजजीवनातील अपवादभूत घडामोडी किंवा खळबळी नसतात, तर समाजजीवनातील प्रवाहित्व व गतितत्त्व व्यक्त करणाऱ्या आणि समाजातील विविधि घटकांची स्पंदने प्रकट करणाऱ्या निरंतर घडामोडी असतात. दोन, सामाजिक चळवळी या चार-दोन व्यक्तींनी केवळ एक टूम म्हणून सुरू केलेला फुरसतीचा उद्योग नसतो तर विविधि सामाजिक मूल्यांच्या आविष्कारार्थ सुरू करण्यात आलेला विविध गटांचा वा समूहांचा दीर्घकालीन उद्योग असतो. तीन, सामाजिक चळवळी या नुसत्याच ऐतिहासिक घटना नसतात तर भविष्यात घडू शकणाऱ्या, दडपलेल्या ऐतिहासिकतेचा तो एका बाजूला हुंकार असतो तर दुसऱ्या बाजूला भूतकाळात न घडलेल्या घडामोडींचा व बदलांचा तो वर्तमानकालीन आविष्कार असतो. या दृष्टीने पाहता सामाजिक चळवळी या इतिहास नामक मानवी प्रक्रियेच्या निरंतर वाहक असतात आणि इतिहासाचे माध्यम म्हणून कार्यरत असतात. चार, त्या समूहाची अस्मिता वा सांस्कृतिक ओळख सांगण्यासाठी, आपापल्या रास्त हितसंबंधांचे जतन व संवर्धन करण्यासाठी, विशिष्ट सामाजिक प्रश्नाची तड लावण्यासाठी किंवा विशिष्ट सामाजिक ध्येयाच्या व मूल्यांच्या प्रवर्तनासाठी केलेल्या सामूहिक कृती असतात.

**51.** सामाजिक चळवळी म्हणजे काय ?

(A) निरंतर चालणारी सामाजिक प्रक्रिया

(B) चार-दोन व्यक्तींनी सुरू केलेली प्रक्रिया

(C) सामाजिक स्थैर्याचे प्रतीक

(D) ऐतिहासिक घटनांचा आविष्कार

**52.** पुढे दोन वाक्ये दिलेली आहेत. (A) वाक्याचे स्पष्टीकरण (R) वाक्यात दिलेले आहे. या दोन वाक्यांच्या आधारे योग्य पर्याय निवडा.

(A) केवळ ऐतिहासिक घटना म्हणजे सामाजिक चळवळी नव्हेत.

(R) सामाजिक चळवळींना इतिहासाबरोबर वर्तमानाचेही भान असावे लागते.

(A) (A) आणि (R) बरोबर, आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) बरोबर, आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आहे, परंतु (R) चूक आहे

(D) (A) चूक आहे, परंतु (R) बरोबर आहे

**53.** चळवळ ही एक सामूहिक कृती असते, कारण

(A) त्यात वर्तमानकालीन जीवनाचा आविष्कार असतो

(B) ती ऐतिहासिक घटनांचा हुंकार असते

(C) ती परिवर्तनाची साक्षीदार असते

(D) त्यात समूहनिष्ठ परिवर्तनाचा आविष्कार असतो

**54.** सामाजिक चळवळ ही

(A) व्यक्तिगत हितसंबंधाचे प्रगटन असते

(B) ऐतिहासिक दस्तावेज असते

(C) सांस्कृतिक संवर्धनाचा पाया असते

(D) क्षेत्रीय परिधाची द्योतक असते

**55.** 'बहिष्कृत भारत' ही संज्ञा प्रथमत: कोणी वापरली ?

(A) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

(B) महात्मा जोतिराव फुळे

(C) विठ्ठल रामजी शिंदे

(D) शाहू महाराज

**56.** भांडवलदारी अर्थव्यवस्थेमुळेच शेतकऱ्यांचे शोषण होते, हे स्पष्ट शब्दांत मांडणारे दोन विचारवंत कोण ?

(a) वि.रा. शिंदे

(b) कृष्णराव भालेकर

(c) दिनकरराव जवळकर

(d) बाबासाहेब आंबेडकर

(A) (a) आणि (c)

(B) (b) आणि (c)

(C) (b) आणि (d)

(D) (c) आणि (d)

**57.** 'कल्पनाशक्तीच्या निर्माणक्षम स्वरूपाला आपण प्रतिभा म्हणतो, तर तिच्याच आस्वादक्षम स्वरूपाला आपण सहृदयता किंवा सदभिरुची म्हणतो' – असे कोणी म्हटले आहे ?

(A) रा. श्री. जोग

(B) श्री. के. क्षीरसागर

(C) रा.ग. जाधव

(D) गो.म. कुलकर्णी

**58.** पुढे दिलेल्या आदिवासी कादंबऱ्या व त्यात आलेले आदिवासी जमातीचे चित्रण यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| (a) जंगलातील छाया | (i) गोंड जमात |
| (b) गोदाराणी | (ii) कातकरी जमात |
| (c) महानदीच्या तीरावर | (iii) माडिया जमात |
| (d) हाकुमी | (iv) वारली जमात |

(A) (a)-(ii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(iii)

(B) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)

(C) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)

(D) (a)-(ii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(iii)

**59.** पद्मा गोळे यांच्या पुढील कविता संग्रहांचा प्रकाशन काळानुसार क्रम लावा.

(A) नीहार, स्वप्नजा, प्रीतिपथावर, आकाशवेडी

(B) स्वप्नजा, आकाशवेडी, नीहार, प्रीतिपथावर

(C) प्रीतिप्रथावर, नीहार, स्वप्नजा, आकाशवेडी

(D) आकाशवेडी, प्रीतिपथावर, स्वप्नजा, नीहार

**60.** 1889 मध्ये विधवा व कुमारिकांसाठी 'शारदा सदन' ही शाळा कोणी सुरू केली ?

(A) सावित्रीबाई फुले

(B) पंडिता रमाबाई

(C) धोंडो केशव कर्वे

(D) ईश्वरचंद्र विद्यासागर

**61.** ''कधी असे साहित्य नवतेचा शोध करीत परंपरेला नाकारीत असते आणि तिचा पुनर्विचार करून तिला अधिक समृद्ध करीत असते. अशा साहित्यांतर्गत परंपरा बदलू पाहणाऱ्या कसदर साहित्याला स्वत्व जपण्यासाठी बाजूला व्हावे लागते. नवसाहित्य हे या प्रकारचे उदाहरण आहे''. असे मत कोणी मांडले आहे ?

(A) दि. के. बेडेकर

(B) वा.ल. कुलकर्णी

(C) रा.ग. जाधव

(D) र.बा. मंचरकर

**62.** विषय, भावनाविवशता, नकली उदात्तता, आशावाद, तंत्र हे सगळे संकेत नवकथेने झुगारले, नवकथाकारांनी मानवी मनाचा वेध घेतला आहे''. असे मत कोणी मांडले आहे ?

(A) गंगाधर गाडगीळ

(B) वसंत पळशीकर

(C) वसंत आबाजी डहाके

(D) चंद्रकांत पाटील

**63.** 'गोंडवन पेटले आहे' हा काव्यसंग्रह कोणाचा ?

(A) भुजंग मेश्राम

(B) वसंत कन्नाके

(C) व्यंकटेश आत्राम

(D) विनायक तुमराम

**64.** 'स्त्रीवाद ही समाजपरिवर्तन घडवून आणणारी राजकीय जाणीव आहे. मानवी समाजामध्ये स्त्री-पुरुषांमध्ये विशिष्ट प्रकारचा सत्तासंबंध जोडला जातो.' हे विधान कोणी मांडले आहे ?

(A) अश्विनी धोंगडे

(B) माधुरी शानभाग

(C) संजय ढोले

(D) सुनंदा बलरामन

**65.** जैनकवी आणि त्यांचे काव्यसंग्रह यांच्या जोड्या लावा.

(a) धनपाल दादू गंगाई (i) जिनज्योत

(b) नीलम माणगावे (ii) गीत सुदर्शन

(c) विजयकुमार बेळंके (iii) गीत महावीर

(d) अ. जि. हुपरे (iv) जयजिनेंद्र

योग्य पर्याय निवडा

(A) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)

(B) (a)-(ii), (b)-(iii), (c)-(iv), (d)-(i)

(C) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(ii)

(D) (a)-(iv), (b)-(i), (c)-(ii), (d)-(iii)

**66.** निरंजन उजगरे यांचे पुढीलपैकी दोन कवितासंग्रह कोणते ?

(a) सांगी

(b) नवे घर

(c) प्रहर

(d) उन्मेष

योग्य पर्याय निवडा

(A) (a) आणि (b) (B) (b) आणि (c)

(C) (b) आणि (d) (D) (c) आणि (d)

**67.** 'एक मुसलमान संत भगवद्गीतेवर भक्तीभावाने सुंदर भाष्य 'लिहितो पण एखादा मराठी संतकवी कुराणावर सूफी दर्शनावर लिहिताना आढळतो काय ?' असे विधान कोणी केले आहे ?

(A) फ. म. शहाजिंदे

(B) हमीद दलवाई

(C) यू.म. पठाण

(D) अ.ना. देशपांडे

**68.** 'जनसाहित्य : चिंतन आणि चिकित्सा' हा ग्रंथ कोणाचा आहे ?

(A) निळकंठ मेंढे

(B) सुभाष सावरकर

(C) सुदाम सावरकर

(D) या. वा. वडस्कर

**69.** 'विज्ञानकथा – कादंबऱ्या लिहिण्यासाठी लेखक वैज्ञानिकच असायला हवा, असे नाही; पण जी विज्ञानकल्पना वापरून तो विज्ञानकथा लिहिणार आहे, त्या कल्पनेत त्रुटी असता कामा नयेत.' असे मत कोणी मांडले आहे ?

(A) व. दि. कुलकर्णी

(B) निरंजन घाटे

(C) बाळ फोंडके

(D) संजय ढोले

**70.** 'मराठी बालवाङ्.मय: स्वरूप आणि अपेक्षा' हा ग्रंथ कोणाचा आहे ?

(A) लीलावती भागवत

(B) सुलभा शाह

(C) लीला दीक्षित

(D) मालतीबाई दांडेकर

**71.** भोजाने सांगितलेल्या काव्यलक्षणात पुढीलपैकी कोणत्या दोन घटकांचा समावेश होतो ?

(a) रस

(b) वक्रोक्ती

(c) निर्दोषता

(d) ध्वनी

(A) (a) आणि (c)

(B) (a) आणि (d)

(C) (b) आणि (c)

(D) (c) आणि (d)

72. ध्वनी हाच काव्याचा आत्मा होय असे कोणी म्हटले ?
(A) भरत (B) दण्डी
(C) राजशेखर (D) आनंदवर्धन

73. मीमांसक आणि त्यांचे ग्रंथ यांच्या जोड्या जुळवा :
(a) जयदेव (i) काव्यालंकार
(b) रुद्रट (ii) अलंकार-रत्नाकर
(c) विश्वनाथ (iii) चंद्रालोक
(d) शोभाकार मित्र (iv) साहित्यदर्पण
(A) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)
(B) (a)-(iii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(ii)
(C) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)
(D) (a)-(ii), (b)-(iv), (c)-(iii), (d)-(i)

74. पुढील मीमांसकांचा त्यांच्या काळानुसार लावलेला योग्य क्रम ओळखा.
(A) भट्टतौत, अभिनवगुप्त, भट्टनायक, राजशेखर
(B) राजशेखर, अभिनवगुप्त, भट्टतौत, भट्टनायक
(C) राजशेखर, भट्टतौत, भट्टनायक, अभिनवगुप्त
(D) अभिनवगुप्त, राजशेखर, भट्टतौत, भट्टनायक

75. 'सविकल्प समाधी' ची उपपत्ती कोणी मांडली ?
(A) द. के. केळकर
(B) न. चिं. केळकर
(C) वा. म. जोशी
(D) वा. ल. कुलकर्णी

76. 'श्रीगुरुगोरक्षनाथ' या ग्रंथाचे लेखक कोण ?
(A) व. दि. कुलकर्णी
(B) बाळाचार्य खुपरेकर
(C) प्र.न. जोशी
(D) रा.चिं. ढेरे

77. पुढीलपैकी म्हाइंभटांचे दोन ग्रंथ कोणते ?
(a) लीळाचरित्र
(b) दृष्टांतपाठ
(c) गोविंदप्रभुचरित्र
(d) ज्ञानप्रबोध
(A) (a) आणि (c)
(B) (b) आणि (d)
(C) (c) आणि (d)
(D) (a) आणि (d)

78. 'स्वयंप्रकाश' या ग्रंथाची रचना कोणी केली ?
(A) बसवलिंग
(B) शिवदास
(C) लक्ष्मण
(D) मन्मथस्वामी

79. 'करण हसुगे' हा ग्रंथ कोणी लिहिला ?
(A) बसवलिंग
(B) रामलिंग
(C) भोजलिंग
(D) शांतलिंग

80. 'लघुरामायण' व 'दीर्घरामायण' लिहिणारे संत कवी कोण ?
(A) रामदास (B) मोरोपंत
(C) मुक्तेश्वर (D) वेणाबाई

**81.** पुढे दोन वाक्ये दिलेली आहेत. (A) वाक्याचे स्पष्टीकरण (R) वाक्यात दिलेले आहे. या दोन वाक्यांच्या आधारे योग्य पर्याय निवडा.

(A) 'गीत' म्हणजे गीतगुणाची कविता.

(R) गीतगुणाची कविता गाता येण्याजोगती असते.

(A) (A) आणि (R) बरोबर असून (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) बरोबर आहेत पण, (R) हे (A) चे स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आणि (R) चूक

(D) (A) चूक आणि (R) बरोबर

**82.** पुढे दोन वाक्ये दिलेली आहेत. (A) वाक्याचे स्पष्टीकरण (R) वाक्यात दिलेले आहे. या दोन वाक्यांच्या आधारे योग्य पर्याय निवडा.

(A) दुष्ट व्यक्ती शोकमग्न होऊ शकते.

(R) ट्रॅजिडी (शोकांतिका)ही कधीही दुष्ट व्यक्तीची होऊ शकत नाही.

(A) (A) आणि (R) बरोबर आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) बरोबर पण (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आहे, परंतु (R) चूक आहे

(D) (A) चूक आहे, परंतु (R) बरोबर आहे

**83.** एकांकिका कशी असावी लागले ?

(A) नाटकाचा एक-अंक शोभेल अशी

(B) नाटकाचा एक प्रवेश म्हणजे एकांकिका

(C) समग्र

(D) व्यामिश्र

**84.** कथेत कोणती भूमी असत नाही ?

(A) वस्तुभूमी

(B) स्वप्नभूमी

(C) मनोभूमी

(D) लेखनभूमी

**85.** वाङ्मय प्रकारासाठी पुढीलपैकी कोणते शब्द वापरले-जातात ?

(A) तत्त्व, प्रमाणबद्धता, रचना

(B) स्वत्व, ढब, उपचार

(C) ठराविक साचा, व्यवस्था, शैली

(D) रूप, घाट, आकृतिबंध

**86.** ॲरिस्टॉटल प्रणित शोकांतिका म्हणजे

(A) करुणरसप्रधान नाटक

(B) जे नाटक शोकातून उद्भवते ते

(C) जिचे पर्यवसान शोकभोगात होते

(D) जिचा नाट्यधर्म केवल शोक आहे

**87.** कथा आणि कादंबरी यांत पुढीलपैकी काय असणे आवश्यक असते ?

(A) घटनाक्रम

(B) स्वभावविक्षेप

(C) भावनाप्राधान्य

(D) शब्द प्रामाण्य

**88.** 'माझे जीवन: एक कादंबरी' हे ना.सी. फडके यांचे पुस्तक कोणत्या वाङ्मय प्रकारात मोडते ?

(A) कादंबरी (B) आत्मचरित्र

(C) ललित निबंध (D) समीक्षा

**89.** स्तुतिकाव्य आणि संस्कृती यांच्या जोड्या लावा.

(a) स्तोत्र (i) लोक

(b) भारूड (ii) नागर

(c) आरती (iii) जनप्रिय

(d) पोवाडा (iv) आदिम

(A) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)

(B) (a)-(ii), (b)-(iii), (c)-(iv), (d)-(i)

(C) (a)-(iv), (b)-(i), (c)-(ii), (d)-(iii)

(D) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(ii)

**90.** भाव कवितेचे अधिष्ठान पुढीलपैकी कशावर असते ?

(A) आत्मशक्तीवर (B) बुद्धीवर

(C) मनसावर (D) भौतिक जडतेवर

**91.** पुढीलपैकी कोणत्या संत कवयित्रीने गौळण रचना केली नाही ?

(A) संत जनाबाई

(B) संत मुक्ताबाई

(C) संत बहेणाबाई

(D) संत कान्होपात्रा

**92.** " हुंदळी पिसवी हलवितो दाढी माळेमणी ओढी निंदेचे तो" ही रचना कोणाची ?

(A) संत जनाबाई

(B) म. फुले

(C) संत तुकाराम

(D) संत एकनाथ

**93.** "तूं उभा ठाकलाचि पुरे: सीधीतें एथौनिचि नेइजेल की :" असे स्वामी कोणास म्हणाले ?

(A) नीळभट्ट भांडारेकर

(B) भटोबास

(C) सारंग पंडित

(D) नाथोबा

**94.** पायदळातील तुकडीच्या प्रमुखास काय म्हणतात ?

(A) चौगुला

(B) बारगीर

(C) नाईकवाडी

(D) सरनौबत

**95.** पुढीलपैकी कोणत्या कविता अरुण कोलटकर यांच्या आहेत ?

(a) मुक्तायक्का

(b) रबीआ

(c) रात्रं दिन आम्हा

(d) काट्याच्या अणीवर

(A) (a) आणि (b)

(B) (b) आणि (c)

(C) (c) आणि (d)

(D) (a) आणि (d)

**96.** साहित्यकृती आणि त्यातील व्यक्तिरेखा यांच्या जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| (a) माणूस | (i) माणिक |
| (b) बनगरवाडी | (ii) कचऱ्या |
| (c) गिधाडे | (iii) रफीक |
| (d) कोण म्हणतंय टक्का दिला | (iv) कारभारी |

(A) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)

(B) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)

(C) (a)-(ii), (b)-(iv),(c)-(iii), (d)-(i)

(D) (a)-(iii), (b)-(iv),(c)-(i),(d)-(ii)

**97.** पुढे दोन वाक्ये दिलेली आहेत, (A) वाक्याचे स्पष्टीकरण (R) वाक्यात दिलेले आहे, या दोन वाक्यांच्या आधारे योग्य पर्याय निवडा.

(A) अंतरीचे धावें स्वभावें बाहेरी । धरितांही परी आवरेना ।। अशी संत तुकारामांच्या अभंगाची घडण आहे.

(R) संत तुकारामांचे वाङ्मय बहुतांशी स्फूर्तिनिष्ठ आहे.

(A) (A) आणि (R) बरोबर, आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) बरोबर, आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आहे, परंतु (R) चूक आहे

(D) (A) चूक आहे, परंतु (R) बरोबर आहे

**98.** पुढील साहित्यकृती त्यांच्या प्रकाशन वर्षाच्या कालानुक्रमे लावा.

(A) गिधाडे, कोण म्हणतंय टक्का दिला, शोभायात्रा, आयदान

(B) कोण म्हणतंय टक्का दिला, शोभायात्रा, आयदान, गिधाडे

(C) शोभायात्रा, गिधाडे, कोण म्हणतंय टक्का दिला, आयदान

(D) गिधाडे, कोण म्हणतंय टक्का दिला, आयदान, शोभायात्रा

**99.** लक्ष्मीबाई टिळक यांना 'साहित्यलक्ष्मी', अशी पदवी कोणी दिली ?

(A) रेव्हरंड टिळक

(B) सोपानदेव चौधरी

(C) आचार्य अत्रे

(D) बालकवी ठोंबरे

**100.** 'भानोरं' या पक्वान्नाचा उल्लेख पुढीलपैकी कोणत्या साहित्यकृतीत आला आहे ?

(A) जिणं आमुचं

(B) माणूस

(C) आयदान

(D) स्मृतिचित्रे

**Space for Rough Work**